नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३.
नि. १५० लगत

<u>शपथेवर सुरू</u>

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १,२,५ ते ७,११,१३,१४ व १६ तर्फे वकील श्री. एस्. जी. पणदुरकर यांचेतर्फे</u>

१४. मला बाबा गव्हाणकर या नावाने ओळखतात. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र सखाराम गव्हाणकर उर्फ बापू गव्हाणकर हा माझा सख्खा भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते सन १९९० पासून सावंतवाडी येथे वकीली व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाने चाफेआळी कोलगांव येथे घर बांधलेले असून त्याठिकाणी ते, त्यांची पत्नी, मी एकत्र रहातो. मी अविवाहित आहे. मी माझ्या भावाकडे रहातो त्यामुळे माझ्या वहिनीने दिलेले जेवण करतो. मी चाफेआळी येथे २० वर्षापूर्वी जेव्हा घर बांधले तेव्हापासून रहातो. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश रामचंद्र धारपवार हा माझ्या भावाकडे अनेक वर्षापासून कारकून आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो आमच्या घराच्या बाजुला रहातो. आमच्या घराच्या बाजुला त्याने जमीन घेवून घर बांधलेले आहे. माझ्या भावाने धारपवार याला जमीन घेवून दिली की नाही हे मला माहित नाही.

१५. अशोक संभाजी सावंत रा. माजगांव याला मी ओळखत नाही. मी ॲड. राजेश रविंद्र पराडकर यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्या भावाकडे शिकण्यासाठी होते. हे म्हणणे खरे आहे की, कुतुबुद्दीन जमाल शेख हे माझ्या भावाकडे कारकून म्हणून कामाला आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ॲड. दिपक बाबली म्हालटकर हे माझ्या भावाकडे वकील म्हणून व्यवसाय करीत होते.

१६. माझे शिक्षण बी.कॉम. पर्यंतचे झालेले आहे. मला आता नि. १९७ कडील खरेदीखत दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीखताने मी दावा मिळकत विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीखतावर प्रकाश रामचंद्र धारपवार, राजेश रविंद्र पराडकर, अशोक संभाजी सावंत, दिपक बाबली म्हालटकर व कुतुबुद्दीन जमाल शेख हे साक्षीदार आहेत. ते खरेदीखत कोठे व कोणी लिहिले हे मला आठवत नाही. त्या खरेदीखतातील मजकूर मला मान्य आहे.

१७. मी मुळ वादी गोविंद कृष्णाजी वाळके यांना ओळखतो परंतु ते आता हयात नाहीत. मी अहिल्या कृष्णाजी वाळके हिला ओळखत नाही. मी पुष्पांकर कृष्णाजी वाळके याला पाहिले होते. अहिल्या व पुष्पांकर हे हयात आहेत की नाही हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र. २० ते २३ यांना पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ हे मयत आहेत. त्यांची पत्नी हयात आहे हे मला माहित आहे. त्यांना मुले आहेत की नाही हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र. ८, ९, हे हयात आहेत की नाही हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र. १७ हयात नाहीत हे मला माहिती आहे. प्रतिवादी क्र. १७ यांना तीन मुले आहेत. ते दिनांक २४/१२/२०१६ रोजी मयत झालेले असून त्यांच्या वारसांना मी पक्षकार केलेले नाही. प्रतिवादी क्र. १८ हे मयत आहेत. त्यांना मुली वारस आहेत त्यांच्या मुली आमच्या जवळच रहातात. त्यांच्या मुलींना वारस म्हणून अभिलेखावर घेतलेले नाही. मी

माझ्या वकीलांना प्रतिवादी क्र.३, ८,९, १७ व १८ हे मयत झाल्याचे सांगितलेले आहे.

१८. मुळ वादी क्र. १ ते ३ पैकी मला केवळ वादी क्र. १ गोविंद वाळके हे भेटले होते. नि. १९७ च्या खरेदीखताच्यावेळी मुळ वादी क्र. १ हे जिवंत होते. खरेदीखताच्यावेळी मुळ वादी क्र. १ यांनी मला हा दावा त्यांनी दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे याची माहिती दिली नव्हती. या दाव्याबाबत माहिती मला सन १९९१–९२ साली झाली. मला ज्यावेळी दाव्याबाबत माहिती झाली त्यावेळी मी त्यांना विचारले होते. त्यावेळी त्यांनी मला त्यांचा दावा चालू आहे असे सांगितले होते. दाव्याबाबत मला खरेदीखतानंतर समजल्यामुळे मी दाव्याचा उल्लेख खरेदीखतात केलेला नाही असे माझे म्हणणे आहे. माझा भाउ मुळ वादी यांचे वकील होते हे मला माहित नाही. मी ॲड. एम. आय. सय्यद यांना ओळखतो. या दाव्यात ॲड. एम्.आय. सय्यद हे वाळके यांचे वकील होते हे मला माहित नाही.

१९. ज्यावेळी दावा दाखल केला त्यावेळी मी कोलगांव येथेच रहात होतो. मला या दाव्याविषयी संपूर्ण माहिती आहे. मला दाव्यासोबत जोडलेला कच्चा हातनकाशा दाखवला. तो हातनकाशा कोणी तयार केला हे मला आता सांगता येणार नाही. त्या कच्च्या हातनकाशावरून तो कोणी तयार केला, त्यावरील हस्ताक्षर कोणाचे आहे, त्यावरील पिवळी खुण कोणी केली, त्यावरील खाडाखोड कोणी केली हे मी सांगू शकत नाही. मला आता नि. १९७ कडील खरेदीखत दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीखतासोबत दावा मिळकतीचा नकाशा जोडलेला नाही. दावा मिळकतीचा मला व दाव्यात नमुद केलेल्या व्यक्तींना कब्जा पाहिजे आहे. परंतु इतर व्यक्तींची नांवे मला सांगू शकत नाही. माझा सावंतवाडी येथे फर्निचरचा व्यवसाय होता. आता मी व्यापार करीत नाही. सन २०११ मध्ये मी व्यापार करीत होतो. साक्षीदार सांगतो की, त्यावेळी मी काजूचा व्यापार करीत होतो. प्रतिवादींनी किती प्लॉट पाडले हे मी सांगू शकत नाही. सर्व प्लॉटच्या मालकांची नांवे मी सांगू शकत नाही. दावा मिळकतीचे मुळ मालक सबनिस होते. त्यांचे पूर्ण नांव मला सांगता येणार नाही. त्यानंतर दावा मिळकत ही लिलावातून वाळके यांनी विकत घेतली व वाळके यांच्याकडून मी विकत घेतली आहे. दावा मिळकतीचे क्षेत्र २८ गुंठे इतके आहे. मी ते क्षेत्र खाजगी मोजणीदाराकडून मोजणी करून घेतलेले आहे. त्या मोजणीदाराचे नांव व ती मोजणी कोणत्या तारखेला केली हे मला सांगता येणार नाही. मी खरेदी करण्यापूर्वी दावा मिळकतीची मोजणी केली नव्हती. साक्षीदार सांगतो की, सन १९९१–९२ सालात मी स्वत: मोजणी करून घेतली होती. तो नकाशा आमच्याकडे आहे की नाही हे मी पहातो, असेल तर मी हजर करण्यास तयार आहे. वाळके यांनी दावा मिळकत मोजली की नाही हे मला माहित नाही.

<u>प्रतिवादींतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u>.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/–

(एम्.एस्.बुधवंत )

दिनांक :– २४/०४/२०१७. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.